# माहितीचा अधिकार

# अधिनियम २००५

# कलम ४ (१) (ख)

vivo V25
Jul 31, 2026, 17:23

# कायदा माहितीचा अन् अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ (४)

## एकुण १७ बाबींची माहिती

भारतीय प्रशासनाला गुप्ततेची परंपरा आहे. ब्रिटीशकालीन गुपितांचा कायदा १९२३ हा गुप्ततावादी प्रशासकीय परंपरेतील महत्वाचा दुवा आहे. शासकिय गुपीतांचा कायदा मुख्यत: संरक्षण यंत्रणेतील महत्वाची स्थळे आणि देशाच्या सुरक्षीततेसाठी निगडीत असणारी माहिती देण्यावर निर्बंध घालणारा कायदा आहे.

परंतु देशाच्या किंवा एखादया व्यक्तीच्या सुरक्षीततेशी ज्याचा संबंध नाही, अशा सर्वच माहितीला हा कायदा लागू आहे, असा समज जवळपास सर्वत्र रूढ करण्यात आला. ज्या माहितीच्या प्रकटीकरणामुळे सार्वजनिक हिताला धोका पोहोचणार नाही अशा माहितीलाही हा कायदा सर्रास लावला गेला.

माहितीच्या अधीकाराने माहितीच्या लोकशाहीचे नवे पर्व सुरू केले आहे. यालाच सुराज्याच्या दिशेने जाणारे दुसरे स्वातंत्र्य असेही म्हटले जाते. या कायदयाचा खरा अर्थ समजुन घ्यायचा असेल तर प्रथम महात्मा गांधीचे ग्राहकाच्या संदर्भातिल खालील उद्गार नागरिकांच्या संदर्भात किती अर्थपुर्ण आणि अंतर्मुख करणारे आहेत हे लक्षात येईल.

**आपल्याकडे येणारे नागरिक हे फार मोलाचे आहेत,**

**नागरिक हे आपल्यासाठी नसून आपण त्यांच्यासाठी आहोत.**

**नागरिक हे आपल्या कामामध्ये व्यत्यय नसून**

**ते आपल्या कामाचा गाभा आहेत.**

**नागरिक कोणी परके नूसन ते ख-या अर्थाने आपले आधारस्तंभ आहेत.**

**त्यांना माहिती व कल्याणकारी सेवा पुरवून आपण उपकार करीत नाही,**

**तर सेवा करण्याची संधी देवून तेच आपणा सर्वांना उपकृत करत आहेत.**

कलम (४) सार्वजनिक प्राधिकरणांवरील आबंधने :-

(१) प्रत्येक सार्वजनिक प्राधीकरण :-

(क) या अधिनियमाद्वारे देण्यात आलेला माहितीचा अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रितीने आणि स्वरूपात सर्व अभिलेख, सुचीबध्द करिल आणी त्याची निर्देशसुची तयार करिल आणि ज्याचे संगणकिकरण योग्य आहे, अशा सर्व अभिलेख्यांचे वाजवी कालावधीत आणि साधन संपत्तीच्या उपलब्धतेनुसार संगणकीकरण केले जात आहे. याची आणि असे अभिलेख पहावयास मिळणे सोयीचे व्हावे म्हणुन संपुर्ण देशातील विविध प्रणालीमध्ये नेटवर्क मार्फत ते जोडले जात आहेत याची खातरजमा करिल.

सर्व अभिलेख, सुचीबध्द करण्यात आलेले आहेत. तसेच ज्यांचे संगणकीकरण योग्य आहे, त्याचे संगणकीकरण करण्यात आलेले आहे.

(ख) हा अधिनियम अधिनियमित झाल्यापासून एकशेवीस दिवसांच्या आत :-

(एक) आपली रचना, कार्य व कर्तव्ये यांचा तपशिल :-

vivo V25
Jul 31, 2026, 17:24

# रचना

पोलीस प्रशिक्षण केंद्राची ब्रिटीश कालीन मुख्य ईमारत सन १८९६ मध्ये बांधण्यात आलेली आहे. सदर इमारत ब्रिटीश काळातील मोह फुलापासून मद्य बनविण्याची Distillery फॅक्टरी होती. ही जागा पोलीस विभागास हस्तातंरीत झाल्यानंतर प्रथम येथे राज्य राखीव पोलीस गट क्र. ९ ची १ कंपनी सन १९७० पर्यंत कार्यरत होती. सन १९७० पासुन पोलीस प्रशिक्षण केंद्र अकोला कार्यान्वीत करण्यात आलेले आहे.

अकोला शहरापासुन ५ कि.मी. अंतरावर वायव्य दिशेला ११ हेक्टर ८९ आर जमिनीवर शासन निर्णय क्र. पीटीएस/१०७०/४३३४१-१२, दि. १३/१०/१९७० अन्वये प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली.

(दोन) आपले अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये :-

vivo V25

# कार्य

पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना (आंतरवर्ग/बाहयवर्ग) अंतर्गत पोलीसांचे मुलभुत प्रशिक्षण दिल्या जाते. तसेच Professional Skill Upgradation (PSU/OPSU), होमगार्ड,तपासी अंमलदार इत्यादी बॅचेस यांना प्रशिक्षण दिल्या जाते. सदयस्थितीचे नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांची बॅच क्रमांक ६७ चे प्रशिक्षण सुरु आहे.

## कर्तव्य

महाराष्ट्र राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना आंतरवर्गाचे प्रशिक्षण (सर्व प्रकारचे कायदे) पोलीस अधिकारी तसेच विधी निदेशक हे प्रशिक्षण देत असतात, त्याचप्रमाणे बाहयवर्ग प्रशिक्षण (ड्रिल, शिस्त, गोळीबार, सुव्यवस्था राखणे इ.) राखीव पोलीस निरीक्षक तसेच कवायत निदेशक हे प्रशिक्षण देत असतात.

# अधिकारी

**Under the Excellent Guidance & Motivation**

**Shri. Krishna Prakash (IPS)**
Addl.D.G.P. Trg. & Spl.Units
M.S. Mumbai

**Shri.Sadanand Date (IPS)**
Director General of Police
Maharashtra state

**Shri.Nishit Mishra (IPS)**
Spl. I.G.P. Trg. & Spl.Units
M.S. Mumbai

## माहिती अधिकारी

| घटकाचे नांव | सहायक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलिय अधिकारी |
|---|---|---|---|
| पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला | श्री विनोद धारस्कर प्र.कार्यालय अधीक्षक | श्रीमती पूनम पाटील उप प्राचार्य | डॉ. निलेश पांडे, प्राचार्य |

**(तिन)** निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायीत्व प्रणाली :-

या कार्यालयाचे आस्थापनेवर उपलब्ध असलेले अभिलेख तसेच महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी निर्गमीत

V25 2026, 17:24

करण्यात आलेले शासन निर्णय, परिपत्रके, मार्गदर्शक सुचना, एस. ओ. पी. तसेच वरिष्ठांनी दिलेल्या सुचना या बाबिंचा सांगोपांग विचार करून, तातडिने निर्णय घेण्यात येतात.

**(चार व पाच)** :- स्वत:ची कार्ये पार पाडण्यासाठी त्याच्याकडून ठरविण्यात आलेली मानके त्यांच्याकडे असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्य पार पाडण्यासाठी त्याच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनिमय, सुचना नियमपुस्तीका अभिलेख:-

महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८८ वर्तणुक तसेच शिक्षा अपील अंतर्गत तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके दिशा निर्देश यांची अंमलबजावणी करण्यात येते.

**(सहा)** :- त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण :-

या कार्यालयाचे आस्थापनेवर खालील नमुद प्रमाणे मंजुर व रिक्त पदाची माहिती दर्शविलेली आहे

vivo V25
Jul 31, 2026, 17:24

| पदे | मंजुर | हजर | रिक्त |
| --- | --- | --- | --- |
| कार्यालय अधीक्षक | ०१ | ०० | ०१ |
| उच्चश्रेणी लघुलेखक | ०१ | ०० | ०१ |
| सहायक लेखा अधिकारी | ०२ | ०१ | ०१ |
| प्रमुख लिपीक | ०३ | ०३ | ०० |
| वरिष्ठ श्रेणी लिपीक | ०८ | ०८ | ०० |
| कनिष्ठ श्रेणी लिपीक | ०९ | ०३ | ०६ |
| **एकुण** | **२४** | **१५** | **०९** |

| | | |
| --- | --- | --- |
| १ | श्री विनोद गोविंदराव धारस्कर | प्रभारी कार्यालय अधीक्षक |
| २ | सहा.ले.अधि. हाफिज शेख | सहायक लेखा अधिकारी |
| ३ | प्र.लि विनोद गोवींदराव धारस्कर | पेंशन लिपीक तथा प्र.लि. लेखा शाखा |
| ४ | प्र.लि श्री पंडित यशवंत गवई | प्रमुख लिपीक आस्थापना |
| ५ | प्र.लि.श्रीमती कल्पना चंद्रप्रकाश धंदरे | प्रमुख लिपीक पत्रव्यवहार, पशा-१ |
| ६ | वंश्रेलि श्री हेमंत विठठलराव कोरडे | आस्थापना- १ |
| ७ | वश्रेलि श्री. राहुल चोधरी | लेखापाल |
| ८ | वश्रेलि श्री सुधाकर कडु चंदन | वि.चौ/प्रा.चौ/ वेतन निश्चिती /मा.अ. |
| ९ | वश्रेलि श्री प्रभाकर बाळू हटकर | आकस्मिक लिपीक/भ.नि. निधी/अग्रीम |
| १० | वश्रेलि श्री. सुनिल क्रां. लास्कर | प्रशिक्षण/आस्था-४ |
| ११ | वश्रेलि श्रीमती प्रियंका चव्हाण | प्रबंधक |
| १२ | वश्रेलि श्री देवीदास रामदास चिमकर | रजा तसेच डि पी जी लिपीक |
| १३ | वश्रेलि श्री राम रामदिन पितळे | पशा-२ |
| १४ | कश्रेली श्रीमती निलीमा काचकुरे | वेतन लिपीक २ |
| १५ | कश्रेलि विजय कैलासप्रसाद मिश्रा | पोलीस कल्याण लिपीक |
| १६ | कश्रेलि सिमा अरूण मैद | आवक /जावक लिपीक |

**(सात)** आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात लोकांशी विचार विनीमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा तपशील.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे नवप्रविष्ट पोलीस प्रशिक्षणार्थी यांना पोलीसांचे मुलभुत प्रशिक्षण देण्यात येते. त्यामुळे लोकांकडून निवेदने प्राप्त होत नाहीत, तथापी लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी उप प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला प्रशासन म्हणुन सदरचा प्रभार पाहतात.

**(आठ)** आपला एक भाग म्हणुन किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तीच्या मिळून बनलेल्या मंडळाचे, परिषदांचे, समित्यांचे आणि अन्य निकायांचे विवरण, आणि त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे याबाबतचे विवरण.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे नवप्रविष्ठ पोलीस प्रशिक्षणार्थी यांना पोलीसांचे मुलभुत प्रशिक्षण देण्यात येते. त्यामुळे उपरोक्त मुद्यांचे अनुषंगाने मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या आणि अन्य निकायांच्या बैठका होत नाहीत.

**(नऊ)** आपल्या अधिका-यांची आणि कर्मचा-याची निदेशीका.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला यांचे आस्थापनेवर खालील नमुद प्रमाणे पोलीस अधिकारी/अंमलदार /शासकिय कर्मचारी /विधी निदेशक हे नेमणुकीवर/प्रतिनियुक्तीवर /कंत्राट पध्दतीने कार्यरत आहेत.

vivo V25
Jul 31, 2026, 17:24

## प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र,अकोला यांच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी/पोलीस अंमलदार यांचे मंजूर, हजर व रिक्त पदांची ३०-०६-२०२६ अखेरची माहिती

| अ.क्र | पदनाम | मंजूर | हजर | रिक्त | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य (पोलीस अधीक्षक) | ०१ | ०१ | ०० | |
| २ | पोलीस उपअधीक्षक | ०२ | ०१ | ०१ | |
| ३ | पोलीस निरीक्षक | २२ | १८ | ०४ | |
| ४ | सहायक पोलीस निरीक्षक | ०४ | ०३ | ०१ | -- |
| ५ | सहायक पोलीस निरीक्षक (अ.मु) | ०१ | ०१ | ०० | -- |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | ०६ | ०४ | ०२ | -- |
| ७ | राखीव पोलीस निरीक्षक | ०५ | ०५ | ०० | |
| ८ | राखीव पोलीस उपनिरीक्षक | ०९ | ०४ | ०५ | - |
| ९ | विधी निदेशक | ०९ | ०५ | ०४ | |
| १० | सहायक पोलीस उपनिरीक्षक | १६ | १६ | ०० | |
| ११ | पोलीस हवालदार कवायक निर्देशक | ५३ | ५३ | ०० | -- |
| १६ | पोलीस नाईक | - | - | - | जून २०२३ आकृतीबंध नुसार मृत संवर्ग |
| १८ | पोलीस शिपाई | २६ | २१ | ०५ | -- |
| | **एकुण** | १५४ | १३२ | २२ | -- |

## प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र,अकोला यांच्या आस्थापनेवरील लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी व गट -ड कर्मचा-यांचे मंजूर, हजर व रिक्त पदांची ३०-०६-२०२६ अखेरची माहिती

| अ.क्र | पदनाम | मंजूर | हजर | रिक्त |
|---|---|---|---|---|
| १ | कार्यालय अधीक्षक | ०१ | ०० | ०१ |
| २ | प्रमुख लिपीक | ०३ | ०३ | ०० |
| ३ | उच्च श्रेणी लघुलेखक | ०१ | ०० | ०१ |
| ४ | सहायक लेखाधिकारी | ०२ | ०१ | ०१ |
| ५ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | ०८ | ०८ | ०० |
| ६ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ०९ | ०३ | ०६ |
| | **एकुण** | २४ | १५ | ०९ |

vivo V25
Jul 31, 2026, 17:25

| | गट-ड (वर्ग-४) चे कर्मचारी | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र | पदनाम | मंजूर | हजर | रिक्त |
| १ | मुख्य स्वयंपाकी | १० | ०८ | ०२ |
| २ | सहायक स्वयंपाकी | २० | ०१ | १९ |
| ३ | भोजनालय सेवक | २० | ०२ | १८ |
| ४ | मोची | ०२ | ०२ | ०० |
| ५ | माळी | ०२ | ०० | ०२ |
| ६ | टेलर | ०२ | ०१ | ०१ |
| ७ | कार्यालयीन शिपाई | ०३ | ०३ | ०० |
| ८ | व्रणोपचारक | ०१ | ०० | ०१ |
| ९ | कक्षसेवक | ०१ | -- | ०१ |
| १० | सफाई कामगार | १० | ०६ | ०४ |
| | दवाखाना स्टाफ | | | |
| अ.क्र | पदनाम | मंजूर | हजर | रिक्त |
| १ | वैदयकीय अधिकारी | ०१ | ०१ | ०० |
| २ | परिचारक/परिचारीका | ०१ | ०१ | ०० |
| **३** | औषधी निर्माण अधिकारी | ०१ | ०१ | ०० |
| | **एकुण** | ७३ | २५ | ४८ |

**(दहा)** आपल्या प्रत्येक अधिका-याला व कर्मचा-याला मिळणारे मासिक वेतन, तसेच प्राधिकरणांच्या विनिमयांमध्ये तरतुद केल्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्याची पध्दती.

उपरोक्त मुद्या क्रमांक ९ प्रमाणे पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला यांचे आस्थापनेवर खालील नमुद प्रमाणे पोलीस अधिकारी/अंमलदार /शासकिय कर्मचारी /विधी निदेश्सक हे नेमणुकीवर/ प्रतिनियुक्तीवर /कंत्राट पदध्दतीने कार्यरत आहेत. त्यांचे नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे ते वेतन आहरीत करीत आहेत.

vivo V25
Jul 31, 2026, 17:25

**या कार्यालयाचे आस्थापनेवर कार्यरत पोलीस अधिकारी/पोलीस अंमलदार तसेच शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना खालील नमुद पे मॅट्रीक्स नुसार वेतन आहरीत केल्या जाते**

| | |
|---|---|
| पोलीस उप अधीक्षक | PAY MATRIX S-20 (56100-177500) |
| पोलीस निरीक्षक | PAY MATRIX S-18 (49100-155800) |
| सहायक पोलीस निरीक्षक | PAY MATRIX S-15 (41800-132300) |
| पोलीस उपनिरीक्षक | PAY MATRIX S-14 (38600-122800) |
| राखीव पोलीस निरीक्षक | PAY MATRIX S-18 (49100-155800) |
| राखीव पोलीस उपनिरीक्षक | PAY MATRIX S-14 (38600-122800) |
| सहायक पोलीस उपनिरीक्षक | PAY MATRIX S-10 (29200-92300) |
| पोलीस हवालदार | PAY MATRIX S-9 (26400-83600) |
| पोलीस नाईक | PAY MATRIX S-8 (25500-81100) |
| पोलीस शिपाई | PAY MATRIX S-7 (21700-69100) |
| कार्यालय अधीक्षक | PAY MATRIX S-14 (38600-122800) |
| सहायक लेखाधिकारी | PAY MATRIX S-15 (41800-132300) |
| प्रमुख लिपीक | PAY MATRIX S-13 (35400-112400) |
| वरिष्ठ श्रेणी लिंपीक | PAY MATRIX S-8 (25500-81100) |
| कनिष्ठ श्रेणी लिपीक | PAY MATRIX S-6 (19900-63200) |
| कार्यालयीन शिपाई | PAY MATRIX S-1 (15000-47600) |
| आश्वासित प्रगती योजना | (PAY MATRIX S-2 (15300-48700) |
| मुख्य स्वयंपाकी | PAY MATRIX S-5 (18000-56900) |
| सहायक स्वयंपाकी | PAY MATRIX S-3 (16600-52400) |
| भोजनालय सेवक/सफाई कामगार | PAY MATRIX S-1 (15000-47600) |
| मोची | PAY MATRIX S-4(17100-54000) |
| टेलर | PAY MATRIX S-3 (16600-52400) |
| वैद्यकीय अधिकारी | PAY MATRIX S-20 (56100-177500) |
| अधिपरिचारक | PAY MATRIX S-13 (35400-112400) |
| औषध निर्माण अधिकारी | PAY MATRIX S-10(29200-92300) |
| व्रणोपचारक | PAY MATRIX S-5 (18000-56900) |
| कक्ष सेवक | PAY MATRIX S-5(18000-56900) |
| विधी निदेशक (कंत्राटी बेसवर) | मानधन प्रति महिना २३०००/- रूपये |

vivo V25
Jul 31, 2026, 17:25

**(अकरा)** सर्व योजनांचा तपशिल, प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुण दिलेल्या अर्थसंकल्प आणि संवितरीत केलेल्या रकमांचा तपशिल.

प्राचार्य,पोलीस प्रशिक्षण केंद्र,अकोला डी.डी.ओ क्र-6201000401

लेखाशीर्ष-20550023

| विवरणपत्र-अ | |
|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज-२०२६-२७ | (रुपये हजारात) |
| दोन अंकी संगणक संकेतांक उद्दिष्टे | **अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७** |
| 01-वेतन | 195978 |
| 02-मजुरी | 4330 |
| 03-अतिकालिक भत्ता | 0 |
| 05-बक्षिसे | 200 |
| 06-दूरध्वनी,विज,पाणी | 7000 |
| 10-कंत्राटी सेवा | 7000 |
| 11-देशांतर्गत प्रवास खर्च | 600 |
| 12-विदेश प्रवास खर्च | 0 |
| 13-कार्यालयीन खर्च | 2500 |
| 14-भाडेपट्टी व कर | 300 |
| 16-प्रकाशने | 0 |
| 17-संगणक खर्च | 700 |
| 18-सुट्टीच्या दिवसाची भरपाई | 125 |
| 19-आहार खर्च | 0 |
| 20-इतर प्रशासकीय खर्च | 0 |
| 21-सामुग्री व पुरवठा | 0 |
| 22-शस्त्रे व दारुगोळा | 0 |
| 24-पेट्रोल तेल व वंगण | 800 |
| 25-पोशाख,राहुटी व भांडारे | 0 |
| 26-जाहिरात व प्रसिद्धी | 0 |
| 27-लहान बांधकामे | 2000 |
| 28-व्यावसायिक व इतर सेवा | 0 |
| 41-गुप्त सेवा खर्च | 0 |
| 42-ठोक तरतूद | 0 |
| 50-इतर खर्च | 600 |
| 51-मोटार वाहन | 600 |
| 52-यंत्र सामुग्री व साधन सामुग्री | 0 |
| एकूण | **222733** |

**(बारा)** अर्थसाहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची रीत तसेच वाटप केलेल्या रकमा आणि कार्यक्रमांच्या लाभाधिका-यांचा तपशिल :-

पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना पोलीसांचे मुलभुत प्रशिक्षण देण्यता येते. त्यामुळे अर्थसाहाय कार्यक्रमांच्या योजना, वाटप तसेच त्यांची अंमलबजावणी या आस्थापनेशी संबंधीत नाही.

**(तेरा)** ज्या व्यक्तीला सवलती, परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशिल.

पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे परवाने किंवा प्राधिकारपत्रे दिली जात नाहीत.

**(चौदा)** इलेक्ट्रानिक स्वरूपात त्यास उपलब्ध असलेल्या किंवा त्यांचेकडे असलेल्या माहितीच्या संबंधीतातील तपाशिल :-

अर्जदारास कोणती माहिती हवी आहे त्यावर ते अवलंबुन आहे.

**(पंधरा)** माहिती मिळविण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असणा-या सुचनांचा तपशिल, तसेच सार्वजनिक वापरांसाठी चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयाच्या किंवा वाचनालयाच्या कामकाजांच्या वेळांचा तपशिल :-

पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथील ग्रंथालयाच्या कामकाजाच्या वेळेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**सकाळी : ०९:३० ते १३:०० वा. पावेतो**
**सायंकाळी : १७:०० ते १९:०० वा. पावेतो**

**(सोळा)** :-जन माहिती अधिका-यांची नावे, पदनामे आणि इतर तपशिल

जन माहिती अधिकारी

| घटकाचे नांव | सहायक जन माहिती अधिकारी | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलिय अधिकारी |
|---|---|---|---|
| पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला | श्री विनोद गोविंदराव धारस्कर | श्रीमती पूनम पाटील | डॉ. निलेश पांडे |

vivo V25
Jul 31, 2026, 17:25

**(सतरा)** : विहीत करण्यात येईल अशी इतर माहिती :-प्रसिध्द करिल आणि त्यानंतर दरवर्षी ती प्रकाशने अद्यावत करील.

(ग) ज्यामुळे लोकांना बाधा पोहोचते अशी महत्वाची धोरणे आखतांना आणि असे निर्णय जाहिर करतांना सर्व संबंधीत वस्तुस्थिती प्रसिध्द करील.

(घ) आपल्या प्रशासनिक किंवा न्यायीकवत् निर्णयाबाबतची कारणे बाधित व्यक्तीला कळविल.

(२)माहिती मिळविण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी नियमित कालांतराने लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे स्वत:हुन माहिती पुरविण्यासाठी पोटकलम १ च्या खंड (ख) च्या आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशिल राहील.

(३)पोटकलम (१) च्या प्रयोजनासाठी प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल आणि अशा स्वरूपात आणि अशा रितीने प्रसारित करण्यात येईल.

(४) पुरेपुर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वात प्रभावी पध्दती याबाबी विचारात घेवून सर्व माहिती प्रसारीत करण्यात येईल. आणि यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांचेकडे शक्यतो इलेक्ट्रानिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहीत करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढया किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढया किंमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

(५) पोटकलम (३) आणि (४) च्या प्रयोजनार्थ प्रसारित याचा अर्थ सुचनाफलक, वृत्तपत्रे, जाहिर घोषणा, प्रसारमाध्यमांकडून ध्वनीक्षेपन, इंटरनेट यांच्याद्वारे किंवा कोणत्याही अन्य मार्गाने लोकांना माहिती करून देणे किंवा कळविणे तसेच कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाच्या कार्यालयाची पाहणी करू देणे असा आहे.

**मुद्या क्रमांक सतरा** च्या अनुषंगाने सादर आहे की, अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज या कार्यालयास प्राप्त होताच त्यावर अर्ज क्रमांक नोंद करून अर्जाप्रमाणे माहिती पुरविणे किंवा नाकारण्या बाबत निर्णय घेण्यासाठी संबंधीत कार्यासनाकडून माहिती प्राप्त करून घेण्यात येते. विहीत मुदतीचे आंत सदर अर्ज निकाली काढण्याचे कायदेशिर बंधन असल्याने संबंधीत कार्यासन यांनी तात्काळ माहिती दयावी करिता त्यांना त्यांचेकडून माहिती उपलब्ध न केले गेल्यास व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८, १९ अथवा २० मधिल तरतुदी नुसार काही जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्न उदभवल्यास कलम ५ (५) अन्वये या अर्जाच्या संदर्भात आपणांस मानिव जन माहिती अधिकारी समजण्यात येवू शकेल या बाबत आपण कृपया नोंद घ्यावी याबाबत कळविण्यात येत असल्याने संबंधीत कार्यासना कडून माहिती तात्काळ उपलब्ध होत असते.

vivo V25
Jul 31, 2026, 17:25

माहिती प्राप्त झाल्यानंतर अर्जदार यांना आपला दिनांक ०० ०० ०००० रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ६(१) प्रमाणे केलेला अर्ज (अर्ज क्रमांक ००/००००) आमच्याकडे प्राप्त झाला. अर्जाच्या शुल्काबाबत आकारलेले शुल्क (फी) आपण (एक महिन्याचा कालावधी) पर्यंत पी.ए. टू प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला या नावाने मनिऑर्डरने, डिमांड ड्राफ्टने अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष रोख रक्कम जमा करून अथवा (राज्य शासकिय कार्यालयाचे बाबतीत - "००७०-इतर प्रशासनिक सेवा,६०, इतर सेवा,८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षावर चलनाने शासकिय कोषागारात जमा करून) शुल्क भरल्याची पावती/चलन अथवा पुरावा सत्य प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोस्टाने सादर करावी असे कळविण्यात येते.

तसेच वरिल प्रमाणे आकारलेल्या फीच्या रक्कमेसंबंधी किंवा दिलेल्या माहितीच्या स्वरूपासंबंधी आपणांस अपील करावयाचे असल्यास आपणांस प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला यांच्याकडे **हे पत्र मिळाल्यापासून ३०** दिवसांत अपिल करता येईल असे कळविण्यात येते.

वरिल प्रमाणे माहिती शुल्क (फि) भरल्याचे चलन /पावती अथवा पुरावा सादर केल्यानंतर शक्य तेवढया लवकर आपणांस माहिती पुरविण्यात येईल असे कळविण्यात येते.

हे सुचनापत्र पाठविल्याच्या तारखेपासून आपण वरिलप्रमाणे माहितीशुल्क (फी) प्रदान करेपर्यंतचा म्हणजे शुल्क (फी) भरावयाचे चलन /पावती अथवा पुरावा सादर करेपर्यंतचा कालावधी माहिती पुरविण्यासाठी निर्धारीत केलेल्या कालावधीची परिगणना वगळण्यात येईल असे कळविण्यात येते..

वरिल नमुद केलेल्या तारखेपर्यंत आपण पुरविण्याचे वरिलप्रमाणे शुल्क भरून चलन सादर न केल्यास आपणांस ही माहिती उपलब्ध करून घेण्यामागे स्वारस्य नाही असे समजुन आपला अर्ज नस्तीबध्द करण्यात येईल असे सुध्दा कळविण्यात येते.

शुल्क प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार कायद्याअंतर्गत माहिती मागण्याच्या अर्जानुसार खालील माहिती कलम ७ (१) मधिल तरतुदीनुसार आपणांस यासोबत उपलब्ध करून देण्यात येत आहे याबाबत खालील नमुद प्रमाणे कळविण्यात येते.

| **अ.क्र** | **माहितीचा संक्षीप्त तपशिल** | **पृष्ठसंख्या** |
|---|---|---|
| **मुददा क्र.१** | माहितीचा तपशिल | **पाने १ ते १०** |
| | एकुण | **१०** |

vivo V25
Jul 31, 2026, 17:25

आपणास वरिल माहिती मान्य नसल्यास हे पत्र मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत नांव श्री. पदनाम, प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला तथा अपिलीय अधिकारी दुरध्वनी क्रमांक, ई-मेल व पत्ता यांचेकडे अपिल करता येईल. असे कळविण्यात येते.

**राष्ट्रपीता महात्मा गांधीचे** ग्राहकाच्या संदर्भातिल खालील उद्‌गार नागरिकांच्या संदर्भात आपल्याकडे येणारे नागरिक हे फार मोलाचे आहेत, **" नागरिक हे आपल्यासाठी नसून आपण त्यांच्यासाठी आहोत. नागरिक हे आपल्या कामामध्ये व्यत्यय नसून ते आपल्या कामाचा गाभा आहेत. नागरिक कोणी परके नूसन ते ख-या अर्थाने आपले आधारस्तंभ आहेत. त्यांना माहिती व कल्याणकारी सेवा पुरवून आपण उपकार करीत नाही, तर सेवा करण्याची संधी देवून तेच आपणा सर्वांना उपकृत करत आहेत ".** तसेच **"काही अल्प लोकांच्या हाती सत्ता देवून स्वराज्य साकार होणार नाही, तर जेव्हा सत्तेच्या दुरूपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य सर्व जनतेमध्ये येईल तेव्हाच खरे स्वराज्य साकार होईल"** ही संकल्पना अर्थपुर्ण आणि अंतर्मुख करणारी असल्याने या संकल्पनेची अंमलबजावणी व्हावी या उददेशाने माहितीच्या अधिकारातील तरतुदीस अनुसरून संपुर्ण पारदर्शीकता ठेवून अर्जदार यांनी विचारलेली माहिती त्यांना तात्काळ कशी पुरविता येईल किंवा अर्जदार हे सुध्दा प्रशासनाचा एक भाग आहे, कणा आहेत, ही भावना त्यांचेमध्ये रुजवावी व समृध्द व्हावी, करिता त्यांना कार्यालयात येवू देणे त्यांचे स्वागत करणे, आवश्यक असेल तेथे त्यांना मदत करणे या बाबीची दक्षता घेवूनच खरे स्वराज्य कसे साकार होईल तसेच लोकशाही कशी वृधींगत होईल याकडे विशेष लक्ष देवून माहितीचा अधिकारातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

**( पूनम पाटील )**
**उप प्राचार्य, तथा**
**जन माहिती अधिकारी ,**
**पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला.**

vivo V25
Jul 31, 2026, 17:26